**दिनांक: 8/3/24**
**विषय: नवीन होणाऱ्या फ्लॅट्सचे प्राथमिक डिझाइन्स.**

बंधू-भगिनींनो,
3 मार्च 24 रोजी संस्थे चे सभासद आणि कुटुंबियांच्या मेळाव्यात आपल्या बिल्डर च्या आर्चीटेक्ट ने सोसायटीच्या पुनर्निर्माण योजनेत सभासदांसाठी होणाऱ्या चारी प्रकारच्या फ्लॅट्स चे डिझाईन दाखविले होते. त्या दिवशी ठरल्या प्रमाणे आज ते सर्व डिझाईन, इंडिपेंडंट फ्लॅट आणि स्प्लिट फ्लॅट अश्या दोन्ही प्रकारात, आपल्या समाज मंदिरात लावण्यात आल्या आहेत.

सभासदांना त्या आज 8/3/24 ला संध्याकाळी 5.30 ते 7.00 ह्या वेळेत तसेच उद्या आणि परवां (9 आणि 10 मार्च,24) सकाळी 9.30 ते 11.00 आणि संध्याकाळी 5.30 ते 7.00 ह्या वेळेत पाहता येतील.

सभासदांना विनंती की त्यांनी डिझाईन्स चा अभ्यास करावा, वाटल्यास फोटो घ्यावेत पण ड्रॉइंग ला हात लावू नयेत. तसेच ज्यांच्या काही शंका, सूचना असतील त्यांनी त्या लेखी स्वरूपात त्यांच्या इमारतीच्या आणि स्वतः च्या नावा सकट सोसायटी ऑफिस च्या बाहेर असलेल्या ड्रॉप बॉक्स मधे 13/3/24 पर्यंत टाकाव्यात. ह्या सर्व शंका / सूचना आर्चीटेक्ट कडे पाठविण्यात येतील. त्या नंतर वेळ ठरवून बिल्डर च्या साइट ऑफिस मधे सभासद आणि आर्चीटेक्ट प्रत्यक्ष भेटून चर्चा करू शकतील. अश्या मीटिंग बद्दल ची पूर्व सूचना सभासदांना देण्यात येईल.

कृपया लक्षात घ्या की ही exercise फक्त फ्लॅट च्या डिझायनिंग पुरती मर्यादित आहे. डुप्लेक्स इमारती च्या डिझाईन वर सध्या काम चालू आहे. ते पूर्ण होताच डुप्लेक्स च्या सभासदांस दाखविण्यात येतील.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती साठी**